# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 28/02/2024 (बुधवार) सायंकाळ

---

### कळमेश्वर येथील खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

फिर्यादी नामे– अमन विनोद मोगरे, वय २८ वर्ष, रा. मोहपा वार्ड क्र. १७ ता. कळमेश्वर हा तंबाखु आणने कामी स्कुटी गाडीने ढोबरे यांचे पान ठेल्यावर गेला असता तिथे काही मुलांचे आपसात भांडण सुरू होते. फिर्यादीचे ओळखीचे सौरभ डहाट रा. म्हासेपठार हा दिसल्याने त्याचे खांदेवर हात ठेवुन बोलला की, ‘‘क्या यार इनके साथ झगडा कर रहा है. जाने दे’’ असे बोलले वरून सौरभ डहाट याने फिर्यादीचे पोटावर डाव्या बाजुला एकदम हाथ मारल्यामुळे पोटातुन रक्त निघाले. रक्त पाहुण पडत पडत चामट यांचे किराणा दुकान जवळ जावुन पळले. आरोपींनी तेथे येवुन काळया रंगाचे चाकुने फिर्यादीचे उजव्या गालावर मारून जख्मी केले. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोस्टे कळमेश्वर कलम ३०७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला होता.

तपासा दरम्यान आरोपीचा शोध घेत असता गोपनीय माहिती द्वारे मिळालेल्या माहितीनुसार **आरोपी नामे– सौरभ संजयराव डहाट वय २३ वर्ष, रा. वार्ड नं. १३ मोहपा** यास कोहळी शिवार येथुन ताब्यात घेवुन त्यास गुन्हयाचे अनुशंगाने सखोल विचारपुस केली असता आरोपीचा मित्र महेश चव्हान याचे सोबत वादविवाद सुरू असतांना जखमी नामे– अमन मोगरे, रा. मोहपा याने मध्यस्ती केल्याने आरोपीने त्याच्या जवळ असलेल्या चाकुने पोटावर मारून जखमी केल्याचे सांगितले. पुढील तपास सुरू आहे.

सदरची सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार योगेश कामाले, पोउपनि मनोज टिपले, पोहवा संजय वानखेडे, पोना अनिशेक, पोहवा अंकुश लाखे, पोशि मनिश सोनवने यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर